डॉ. एस. एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.०१ एप्रिल, २०१८ ते दि.३१ मार्च, २०२० या पुढील २ वर्षाकरीता वाढविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांकः सुसंके-१०१७/प्र.क्र.११८/का.१४१८

मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ३१ मार्च, २०१८

<u>संदर्भ</u>:- १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः सुसंके-१०१२/प्र.क्र.९१/का.१४२७, दि.०४ फेब्रुवारी, २०१३.

२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः सुसंके-१०१५/प्र.क्र.२२०/का.१४२७, दि.१५ मार्च,२०१६.

३) नियोजन विभागाचे पत्र क्रमांकः सुसंके-१०१२/प्र.क्र.९१/का.१४२७, दि. २८ मार्च, २०१३.

<u>प्रस्तावना</u> :-

नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर येथे डॉ.एस. एन.दास यांची अ.क्र. १ वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर या पदावर प्रतिनियुक्तीने ३ वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये डॉ. एस. एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांना दि.०१ एप्रिल,२०१६ पासून पुढील २ वर्षासाठी प्रतिनियुक्ती मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांचा या वाढीव प्रतिनियुक्तीवरील कालावधी दि.३१ मार्च, २०१८ रोजी संपत असल्याने डॉ. एस.एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांना दि.०१ एप्रिल, २०१८ ते दि.३१ मार्च, २०२० पर्यंत प्रतिनियुक्तीचा कालावधी २ वर्ष वाढवून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

डॉ. एस.एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांचा सदर पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.०१ एप्रिल, २०१८ ते दि.३१ मार्च, २०२० या दोन वर्षा करीता ह्या शासन निर्णयान्वये वाढवून देण्यात येत आहे. सदर २ वर्षाचा वाढीव प्रतिनियुक्तीच्या कालावधीसाठी शासनाचे पत्र नियोजन विभाग क्र.सुसंके-१०१२/प्र.क्र.९१/का.१४२७, दि.२८/०३/२०१३ च्या पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्ती कायम राहतील.

२. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाच्या दि. १७ जून, २०१० च्या ज्ञापनातील अट क्र. ८.३.१ (i) नुसार विशेष कार्य अधिकारी, अंतरिक्ष विभाग, भारत सरकार, बेंगलोर यांनी पत्र क्र.B.१८०११/७/२००७-III(Vol.I), दि.२८फेब्रुवारी, २०१८ अन्वये दिलेल्या सहमती नुसार व शासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११०५८१२२८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.04.02 17:31:28 +05'30'

(वि.फ.वसावे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
डॉ. एस. एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), व्ही. एन. आय. टी. कॅम्पस, दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर - ४४० ०१० यांना माहिती करीता अग्रेषित.

प्रत,

१. मुख्य सचिव तथा अध्यक्ष नियामक मंडळ
२. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. नियामक मंडळाचे सर्व सदस्य *
४. अध्यक्ष, इस्त्रो तथा अंतरिक्ष विभाग, भारत सरकार, भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संगठण, अंतरिक्ष भवन, न्यु बि.ई.एल.रोड, बेंगलोर-५६० ०९४.
५. सायंटिफिक सेक्रेटरी, इस्त्रो / डिओएस, इस्त्रो मुख्यालय, भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संगठण, अंतरिक्ष भवन, न्यु बि.ई.एल. रोड, बेंगलोर-५६० ०९४.
६. संचालक, राष्ट्रीय सुदुर संवेदन केंद्र, बाला नगर, हैद्राबाद- ५०० ०३७.
७. मुख्य महाव्यवस्थापक, आरसीज/एनआरसी, बाला नगर, हैद्राबाद- ५०० ०३७.
८. मुख्य, प्रादेशिक सुदूर संवेदन सेवा केंद्र-मध्य, अंतरिक्ष विभाग, भारत सरकार, नागपूर-४४० ००१.
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर. ४४० ००१.
१०. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर-४४० ००१.
११. सह सचिव (का.१४१८), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर-४४० ०११.
१३. प्रशाकीय अधिकारी, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर-४४० ०११.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर-४४० ००१.
१५. कार्यासन १४१८/१४२७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१६. निवड नस्ती का. १४१८, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

* महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांच्या मार्फत.